MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक – दिपक थोरात

## लाडक्या बहिणींचा विजय, उच्च न्यायालयामुळे योजनेची विश्वासर्हता वाढली; आदिती तटकरेंकडून अभिनंदन

उच्च न्यायालयाने नुकत्याच मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेसंदर्भात दिलेल्या निर्णयानंतर राज्यभरातील लाडक्या बहिणींचा विजय झाला असल्याचे सांगत महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे योजनेची विश्वासार्हता वाढल्याने न्यायालयाचे आभार मानले आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना मानल्या जाणाऱ्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या पहिल्या हप्त्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लाडकी बहीण योजनेला दिलेलं आव्हान मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळलं आहे. सरकारच्या धोरणात हस्तक्षेप करण्यास कोर्टाने नकार दिला आहे. त्यामुळे राज्य सरकारला मोठा दिलासा मिळाला असून १४ ऑगस्टला सरकारी तिजोरीतून जाणा–या पहिल्या हफ्त्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –३१३ | सोमवार दि.०५ ऑगस्ट २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -313 | MONDAY DT.05 AUGUST 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# माजलगाव मतदार संघात प्रकाश सोळंकेना पराभव दिसून आल्यामुळे जयसिंह सोळुंखेच्या नावाची घोषणा?

- माजलगाव मतदार संघामध्ये प्रकाश दादांनी मराठा समाजाच्या युवकांवर अनेक गुन्हे दाखल केलेले प्रकाश दादांना भोवनार?
- महाराष्ट्राच्या राजकारणात चुलत्या पुतण्याचा राजकारण माजलगाव मध्ये हे दिसून आलं पुतण्या फुटीच्या वाटेवर असताना प्रकाश सोळंकेने केले राजकीय उत्तराधिकारी म्हणून घोषणा
- मराठा आंदोलनामध्ये मागासवर्गीय समाजाच्या कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करून प्रकाश सोळंकेने स्वतःची नाचक्की करून घेतली?
- मागासवर्गीय समाजातील अनेक निष्ठावंत कार्यकर्त्यांना प्रकाश सोळंकेने काय दिले
- मागासवर्गीय समाजाच्या सरपंचाला वेठीस धरणे गाव पातळीवर जवळच्या कार्यकर्त्यांनी मागासवर्गीय समाजाच्या सरपंचांवर अन्याय केलेले प्रकाश दादांना भोवनार?
- जल जीवन मिशन अंतर्गत कोट्यावधी रुपयांच्या कामांमध्ये गुत्तेदारांना पोचणाऱ्या प्रकाश सोळंकेला अनेक गावांमधून दे धक्का म्हणून दादांची माघार
- माजलगाव मतदार संघामध्ये अनेक गुत्तेदारांना पुसून बोगस रस्ते फक्त कागदावर दाखवून गुत्तेदारांना पोचणाऱ्या प्रकाश सोळंकेला वेगवेगळ्या मतदार संघातील गावांमधून घरचा रस्ता म्हणून प्रकाश दादांची माघार

**माजलगाव मतदारसंघांमध्ये चुलत्या पुतण्याचा राजकारण गेल्या पंचवार्षिक ला पेटलं होतं जयसिंह सोळुंके हे अजित पवारांचे निकटवर्तीय नातेवाईकांपैकी एक आहेत अजित पवार यांनी शरद पवारांचे राष्ट्रवादीतून बाहेर पडत असताना प्रकाश सोळुंके यांनी दबावापोटी म्हणजेच आपल्या पुतण्या अजित पवारांसोबत जाऊ शकतो या भीती पोटीस त्यांनी अजितदादा गटामध्ये शरद पवार गटातून प्रवेश केलेला आहे अशी चर्चा माजला मतदारसंघांमध्ये आहे परंतु मराठा ओबीसी वादामध्ये प्रकाश सोळंकेने मोठा फटका बसणार आहे या वादामध्ये मराठा आंदोलकांवर प्रकाश दादांनी ३६० सारखे गुन्हे दाखल करून आपली नाचती करून घेतली अशी चर्चा माजलगाव मतदार संघातील मराठा समाज बांधवांमध्ये प्रकाश दादांच्या विरोधामध्ये मोठा रोष असतानाच आता मात्र प्रकाश सोळुंखे यांनी स्वतःचा पराभव डोळ्यासमोर दिसतात स्वतःच्या पुतण्याला आपला राजकीय उत्तराधिकारी म्हणून घोषित केले आहे परंतु माजलगाव मतदारसंघांमध्ये प्रकाश सोळुंखे यांचा पराभव २०२४ ला आढळ असल्यामुळे त्यांनी प्रकाश सोळुंके यांनी माघार घेत पुढील आमदारकीचा व आमच्या परिवारातील उत्तराधिकारी म्हणून यशस्वी यांची गोष्ट केली आहे मात्र यावेळी प्रकाश सोळुंके व जैसे सोळुंके यांच्यामध्ये काहीतरी वादाची ठिणगी पडल्यामुळे येणाऱ्या काळामध्ये शरद पवार यांचे पुतणे अजित पवार बाळासाहेब ठाकरे यांचे पुतणे राज ठाकरे तसेच महाराष्ट्रातील दिग्ड नेत्यांपैकी असलेले माजी मंत्री जगत शिरसागर यांची पुतण्या संदीप क्षीरसागर यांच्यामध्ये काका पुतण्यांचा दुरावा निर्माण झाल्यामुळे परिवारामध्ये तणाव निर्माण होऊन आपली राजकीय कारकीर्दीला कुठे गालबोट लागू नये म्हणून दादांनी माघार घेतली असल्यास ही चर्चा यावेळी मतदारसंघात ऐकायला मिळत आहे**



### पराभव डोळ्यासमोर दिसत असताना माजलगाव मतदार संघात प्रकाश सोळुंकडून जयश्री सोळुंखे यांची राजकीय उत्तर अधिकारी म्हणून दादांनी केला जाहीर

### पुतण्या जैसे सोळुंके फुटणार का म्हणून प्रकाश दादांनी माघार घेतली की ही माजलगाव मतदार संघात चर्चा?

### जसे सोळुंके यांना अनुभव कमी लोकांपर्यंत पोहोचण्याचे मोठे आव्हान?

माजलगाव /प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये चुलत्या पुतण्याचा वाद हा नवीन नाही तर तो जुनाच आहे माजलगाव मतदार संघात सुद्धा अशीच काहीतरी परिस्थिती निर्माण झाली असताना यावेळी मात्र प्रकाश सोळंके यांचे पुतणे यांचे नाव राजकीय वारसदार म्हणून त्यांनी पुढे केले परंतु तुमच्या पुतण्याच्या राजकारणात माझा पुतण्या जयसिंह सोळंकी हा कुठून दुसरीकडे जाईल व माझा पराभव २०२४ ला आढळ आहे मराठा ओबीसी वादामध्ये आता दलित मुस्लिम ही मतदान माझ्यापासून दूर गेले आहे यामुळे प्रकाश सोळंके यांनी माघार घेतली चर्चा माजलगाव मतदारसंघांमध्ये पाहायला मिळत असतानाच माजलगाव मतदारसंघांमध्ये आता नवीन राजकीय घडामोडींना सुरुवात होणार आहेबरं झालं आ. प्रकाशदादा सोळंके यांना चांगली गोष्ट सुचली आणि त्यांनी एखाद्याचा राज्याभिषेक करावा, याप्रमाणे पुतण्याला पुढे केले. नाही तर विधानसभा निवडणूकीत फार वाईट हाल झाले असते, एवढा रोष लोकांमध्ये आहे. तसे पाहीले तर जयसिंग सोळकेंचाही खुप काही जनसंपर्क नाही. ते अभ्यासू आहेत मात्र अजुन तळागाळातील लोकांपर्यंत पोहचलेले नाहीत. प्रकाशदादांविषयी असलेल्या नाराजीचा फटका मात्र जयसिंग सोळकेंना बसु शकतो. दादा, पुतण्याला पुढे करून तुम्ही तिसरी पिढी पुढे केली. आता आणखीन चौथ्या पिढीलाही असंच पुढं करा, असे माजलगांवकरांमध्ये बोलले जाऊ लागले.माजलगांव मतदार संघाचे विद्यमान आ. प्रकाशदादा सोळंके यांनी शनिवारी आपले राजकीय वारस म्हणून पुतणे जयसिंग सोळंके यांना पुढे केले. एखाद्या राजाने राजपुत्राचा राज्याभिषेक करावा, याप्रमाणे प्रकाशदादांनी तिसरी पिढी माजलगांवकरांसमोर आणली. जयसिंग सोळंके या पूर्वीपासूनच राजकारणात सक्रीय आहे. मात्र त्यांना पाहिजे तेवढी छाप लोकांवर पाडता आलेली नाही. अभ्यासू असले तरी त्यांचा जनसंपर्क कमी आहे. आता राजकीय वारस म्हणून त्यांचे नाव पुढे आलेच आहे तर त्यांना हा जनसंपर्कही वाढवावा लागेल. काका प्रकाशदादा यांच्यावर असलेल्या लोकांच्या रोषाला देखील जयसिंग सोळंकेंना सामोरे जायचे आहे. लोकांच्या प्रचंड तक्रारी आहेत. दादांविषयी मोठी नाराजी आहे. ऊसाचा प्रश्न असो की रस्त्याचे प्रश्न प्रत्येक गाव त्यांच्या कर्तृत्वावर नाराज आहे, हे यापुर्वी अनेकवेळा समोर आलेले आहे. गेल्या पंचवार्षिक निवडणूकीच्यावेळीच प्रकाशदादांनी ही माझी शेवटची निवडणूक आहे, असे सांगुन राजकीय वारस पुढे करण्याचे संकेत दिले होते. त्यानुसार विधानसभा निवडणूका अवघ्या काही महिन्यावर आलेले असतांना प्रकाशदादांनी जयसिंग सोळंकेंचे नाव पुढे केले आहे. खरं तर हा निर्णय म्हणजे प्रकाशदादांना सुचलेली सुबुध्दी म्हणावी लागेल. कारण त्यांच्याविषयी मतदार संघात मोठी नाराजी आहे. जलजीवनच्या कामात कोट्यावधी रूपयांची उधळपट्टी झाली, यामध्ये ज्या गुत्तेदारांनी पैसे खाल्ले ते गुत्तेदार आमदार समर्थक होते. भलेही आमदारांना हे माहित नसावे, परंतु त्यांच्या नावावरच या लोकांची गुत्तेदारी चालत होती. गुत्तेदारांनी योजनांची वाट लावुन मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केला. त्या गुत्तेदारांना दादांनीच पाठीशी घातले, अशी चर्चा आहे. काही गावातील पाणी प्रश्न, रस्त्यांचे प्रश्न, विजेचा प्रश्न आणि आ. प्रकाशदादांनी दुर्लक्ष केले. त्यामुळेच त्यांच्याविषयीचा रोष वाढत गेला. या सर्व प्रश्नांकडे दुर्लक्ष करणारे आ. प्रकाशदादा उद्या स्वतःला मत मागण्यासाठी लोकांसमोर गेले असते तर त्यांना मतदारांनी स्पष्ट शब्दात नाकारले असते. मात्र आजच्या निर्णयामुळे झाकली मुठ सव्वा लाखांची असेच झाले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये बहिण भावाचा धबधबा असून पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांचा या मतदारसंघावर मोठा मतदानाचा आकडा एक गट आहे यामुळे या मतदारसंघांमध्ये पंकजा मुंडे व धनंजय मुंडे ठरवतील तोच उमेदवार असेल परंतु यावेळी होता म्हणून त्यांनी पुतण्याला पुढे केलं अशीही चर्चा मतदारसंघात जोर करत आहे.

# शेख हसीना हेलिकॉप्टरने अज्ञातस्थळी रवाना, भारतात आश्रय घेणार? बांगलादेशमध्ये लष्करी राजवट लागू होण्याची शक्यता

ढाका: बांगलादेशमध्ये उसळलेल्या यादवी संघर्षाच्या पार्श्वभूमीवर देशाच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. शेख हसीना आपल्या बहिणीसह काहीवेळापूर्वीच हेलिकॉप्टरने अज्ञातस्थळी रवाना झाल्या आहेत. शेख हसीना यांनी बांगलादेशची सूत्रे सोडल्यानंतर आता देशात लष्करी राजवट लागू होण्याची शक्यता आहे. शेख हसीना यांनी आपले सरकारी निवासस्थान सोडल्यानंतर आंदोलकांनी त्यांच्या घराचा ताबा घेतला आहे. त्यामुळे आता बांगलादेशमध्ये 'न भूतो न भविष्यती' परिस्थिती निर्माण झाली आहे.

शेख हसीना या पुढील काही काळासाठी भारतात आश्रय घेऊ शकतात, असेही सांगितले जात आहे. बांगलादेशमध्ये सध्या प्रचंड मोठा नागरी संघर्ष सुरु आहे. या हिंसाचारात आतापर्यंत ३०० हून अधिक जणांना आपले प्राण गमावले आहेत. त्यामुळे बांगलादेशातील परिस्थिती गंभीर झाली होती. आरक्षणाच्या मुद्द्यावरुन सुरु झालेल्या आंदोलनाचे लोण देशभरात पसरत जाऊन टोकाची परिस्थिती निर्माण झाली. अखेर आपण ही परिस्थिती हाताळू शकणार नाही, हे ध्यानात आल्यामुळे शेख हसीना यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्याचे सांगितले जाते.

बांगलादेशात जुलै महिन्यापासून विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरु केलं होतं. सरकारी नोकरीत सध्या असलेला आरक्षणाचा कोटा रद्द करावा, अशी या विद्यार्थ्यांची मागणी होती. या आंदोलनानंतर शेख



हसीना सरकारने काही कोटा कमी केला, मात्र तरीही आक्रमक आंदोलकांनी शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती.

### आरक्षणाचा नेमका वाद काय?

शासकीय नोकरीत मिळणाऱ्या आरक्षणाच्या मुद्द्यावरून बांगलादेशमध्ये आंदोलन पेटले होते. १९७१ साली बांगलादेशची निर्मिती झाली. या लढ्यात ज्या लोकांनी आपले योगदान दिलेले आहे, त्यांच्या वंशजांना मिळत असलेले आरक्षण कायम राहावे, असे आंदोलकर्त्यांचे मत आहे. तर हे आरक्षण आता बंद करावे, असे दुसऱ्या एका गटाचे मत आहे. बांगलादेशच्या स्वातंत्र्य संग्रमात सामील झालेल्या लोकांच्या कुटुंबीयांना बांगलादेशमध्ये ३० टक्के आरक्षण मिळते. या देशात धर्माच्या आधारावर अल्पसंख्यांकांना ५ टक्के आरक्षण दिले जाते. एक टक्का आरक्षण दिव्यांगांना दिले जाते. या लढ्यात ज्या लोकांनी आपले योगदान दिलेले आहे, त्यांच्या वंशजांना मिळत असलेले आरक्षण कायम राहावे, असे आंदोलकर्त्यांचे मत आहे. तर हे आरक्षण आता बंद करावे, असे दुसऱ्या एका गटाचे मत होते. या आरक्षण व्यवस्थेविरोधात जुलै महिन्यात सुरु झालेल्या आंदोलनाने अल्पकाळात उग्र स्वरुप धारण केले होते.

# शुन्यातून विश्व निर्माण करणारा गावांदरा नगरीचा युवा उद्योजक गणेश बडे

बीड ।प्रतिनिधी

गावांदरा धारूर जी बीड,येथील युवा तरुण गणेश महादेव बडे यांनी गुत्तेदारी या क्षेत्रात उंच झेप घेतली आहे,एक सर्व सामन्य कुटुंबातून ते दिलीप बिल्ड कॉन येथे गुत्तेदार इथपर्यंत त्यांनी भरारी घेतली आहे,त्यांनी कर्नाटक, तसेच मद्यप्रदेश,येथे त्यांनी गुत्तेदारी क्षेत्रात कार्य केलं आहे,सध्या ते तेलगणा या राज्यात कार्यरत आहेत,तसेच त्यांना पुढील



भावी आयुष्यासाठी खूप शुभेच्या व गुत्तेदारी क्षेत्रात मोठ नाव व्याहे याच त्यांच्या वाढदिवसानिमत्त सर्व मित्र परिवाराकडून शुभेच्छा

# बीड जिल्ह्यात ६, राज्यात २०० पेक्षा जास्त जागा लढवणार प्राध्यापक टी. पी. मुंडे सरांचा एल्गार

दिनांक ४ रविवार रोजी शासकीय विश्रामगृह बीड येथे ओबीसी समाजातील प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी व प्रतिष्ठित ज्येष्ठ नागरिकांची बैठक तसेच पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषद तसेच बैठकीचे आयोजन बीड विधानसभा मतदारसंघाचे प्रमुख व लोकप्रिय समाजसेवक श्री नितीनजी जायभाये यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी पत्रकार बांधवांच्या सोबत झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये ओबीसी चे ज्येष्ठ नेते आदरणीय प्राध्यापक टी पी मुंडे सरांनी पत्रकारांच्या समोर ओबीसी बहुजन पार्टीची भूमिका स्पष्ट केली. यावेळी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे देताना बीड जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाच्या सहाही जागा आणी महाराष्ट्रातील २०० पेक्षा जास्त जागा ओबीसी बहुजन पार्टी लढवणार अशी पक्षाने घेतलेली भूमिका स्पष्ट केली. उरलेल्या जागांची चाचपणी व दौरे चालू आहेत हे स्पष्ट केले. सकल ओबीसी समाज आता एकजूट आणि



जागृत झाला आहे व ओबीसी समाजाचे सर्वाधिक संख्याबळ लक्षात घेता महाराष्ट्राच्या विधानसभेवर फक्त सकल ओबीसी समाजाचा झेंडा फडकणार व महाराष्ट्र राज्यामध्ये ओबीसी समाजच सत्तेत येणार असा ठाम विश्वास व्यक्त केला , व महाराष्ट्रामध्ये सकल ओबीसी समाजाची सत्ता आणणार आणि प्राण गेला तरी चालेल पण मागे हटणार नाही, असा निर्धार व्यक्त केला. त्याचबरोबर या देशात आणि महाराष्ट्रामध्ये विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान वाचविणे आणि संविधानाने दिलेल्या ओबीसी समाजाच्या हक्कांचे रक्षण करणे ही काळाची मोठी गरज बनली आहे हे ही स्पष्ट केले. यावेळी या बैठकीला डव्होकेट अनिल बारगजे, डॉ संदीप आंधळे, ओबीसी चे नेते समाजसेवक तथा उद्योजक दिनेश दादा मोंढेकर , पक्षाचे सचिव रफिकभाई कुरेशी , फैयाज सय्यद इक्बाल भाई सर्व पदाधिकारी प्रमुख कार्यकर्ते आणि जेष्ठ नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# सेवेचे ठाई तत्पर आरोग्य क्षेत्रातील रुग्णांसाठी बाजीराव चव्हाण सदैव तत्पर

महाराष्ट्राचे संवेदनशिल मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब सहृदय असलेले तळागाळातून वर गेलेले नेते म्हणून संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांची ख्याती आहे. त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात एकही रूग्ण उपचाराविना वंचित राहणार नाही अशा सूचना त्यांनी केल्या होत्या. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेशदादा चिवटे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी टाकलेला विश्वास सार्थ करून महाराष्ट्रातील रूग्णांना मदत देण्यासाठी रूग्णसेवक म्हणून कायमस्वरूपी काम करत आज ते संपूर्ण महाराष्ट्रात आरोग्यदूत म्हणून ओळखले जात आहेत. व धर्मवीर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष बाजीराव चव्हाण यांच्या पाठपुराव्याने रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून मदत घडत आहे

जुलै महिन्यात मदत झालेल्या रुग्णांची खालील प्रमाणे नावे



१) पल्लवी बापूराव घुमरे नवजात बालक पन्नास हजार २) सविता रेवनाथ घुगे नवजत बालक पन्नास हजार ३) लताबाई महादेव ठोसर हृदयरोग पन्नास हजार ४) तुळशीराम गणपत मस्के हृदयरोग ७५००० ५) आजिनाथ कचरू भवर ही रिप्लेसमेंट एक लाख रुपये ६) अशोक येडू सकुंडे विशेष प्रकरण ५०००० ७) मीरा चंद्रकांत तुपे केमोथेरेपी ५०००० ८) आसमा मुजीब शेख नवजात बालक ५०००० ९) शेख रेश्मा शेख नवजात बालक पन्नास हजार १०) मोनिका भाऊसाहेब जाधव नवजात बालक पन्नास हजार ११) जानकी अनिरुद्ध नाईकवाडे मेंदू रोग एक लाख १२) साधना विकास वाघमारे नवजात बालक पन्नास हजार १३) नेटके परसराम आसाराम हिप रिप्लेसमेंट एक लाख १४) चैतन्य शुभम बहिर नवजत बालक ५०००० १५) अशोक लक्ष्मण धसे हिप रिप्लेसमेंट एक लाख १६ ) हिंदू शिव मार्तंड प्रभाळे नवजात बालक पन्नास हजार १७ ) सतीश घनश्याम गीते कर्करोग एक लाख १८) निकिता काशिनाथ कोरडे नवजात बालक चाळीस हजार १९) सचिन सुरेश सारंगकर कर्करोग एक लाख २०)ज्ञानेश्वरी योगेश नवले गेवराई मदत ५०००० हजार रुपये २१) सय्यद मोहम्मद फैज अली बीड १,००,००० रुपये २२) सय्यद मोहम्मद फैज अली गेवराई ५०००० हजार रुपये २३) राधा आकाश भाकरे पाटोदा ५००० हजार रुपये २४) आणि रुंद रुस्तम तुरे परभणी १,००,००० रुपये २५) सपना गुंड्या स्वामी तुळजापूर ४०००० हजार रुपये २६) गिरजाबाई निवृत्ती भांडे माळशिरस ७५००० २७) रामदास सुभाष शितोळे शिरूर १,००,००० रुपये २८) संजय राजकुमार कोसन अपघात एक लाख रुपये २९) अमीन हमीद शेख मेंदू रोग एक लाख ३०) अशोक मारुती चव्हाण हृदयरोग एक लाख

# ६०० गोण्या जप्त; भेसळयुक्त निर्मितीचा डाव फसला

प्रतिनिधी । बीड

बीड: दुधात भेसळ करणाऱ्यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सज्जड दम दिला आहे. तसेच, दुधात भेसळ केल्याचं निदर्शनास आल्यानंतर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचंही अजित पवार यांनी म्हटलं आहे. मात्र, दुसरीकडे बीड जिल्ह्यात तब्बल ६०० पोती पावडर सापडल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील टाकळी अमिया फाट्याजवळ असलेल्या एका गोडाऊनमध्ये भेसळयुक्त दूध तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पावडरचा ६०० गोण्या असलेला साठा अन्न सुरक्षा प्रशासन व पोलिसांनी धाड टाकुन जप्त केला. आज पहाटेच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी गुन्हा दाखल करुन पोलिसांनी एकाला ताब्यात घेतलं आहे. अंबादास पांडुरंग चौधरी असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव आहे.

आष्टी तालुक्यातील टाकळी अमिया येथील अंबादास पांडुरंग चौधरी याचे कडा येथील टाकळी अमिया रोडलगत साईदत्त एंटरप्राययजेस नावाने दुकान आणि लगत पत्र्याच्या शेडमध्ये गोडाऊन देखील आहे. या गोडाऊनमध्ये भेसळयुक्त दूध निर्मित्तीसाठी वापरण्यात येणाऱ्या पावडरचा मोठा साठा असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाला मिळाली होती. गोपनीय माहितीच्या आधारे अन्न व पोलीस प्रशासनाने आज पहाटे या





ठिकाणी धाड टाकली. गोडाऊनची पाहणी केली असता भेसळयुक्त दुधाची निर्मिती करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पावडरचा मोठा साठा आढळून आला. त्यानंतर, पोलीस व अधिकाऱ्यांनी या पावडरची पाहणी करुन, तपासणी केली. त्यानंतर, या गोदामात आणखी किती बॅग्ज आहेत, याचीही शहानिशा केली. त्यावेळी, तब्बल ६०० गोण्या पावडर जप्त करण्यात आली आहे. या कारवाईने जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

## भेसळयुक्त दुधामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ

दरम्यान, एकीकडे दुधाला चांगला दर मिळावा म्हणून शेतकरी सातत्याने आंदोलनाच्या माध्यमातून सरकारपुढे गाऱ्हाणे मांडतो. दुध उत्पादक संघ किंवा डेअरी मालकांकडून दुधाला योग्य दर दिला जात नाहीत. अनेकदा दुधाच्या फॅटवरुनही डेअरचालक आणि शेतकऱ्यांमध्ये वाद होताना दिसून येतो. तर, डेअरीमध्ये दूध पावडरचा वापर करुन भेसळयुक्त दूधही बनवले जाते. दुधात होणारी भेसळ ही अनेकदा नागरिकांच्या जीवाशी खेळ करणारी ठरू शकते. त्यामुळे, भेसळ करणाऱ्यांवर कडक कारवाईची मागणीही होत असते.

# रेल्वे अधिकारी श्री. कदम यांची मुलगी चि.सौ.का. योगिता आणि चि. अजिंक्य यांचा पर्यावरण पूरक लग्न सोहळा





आज मंगळवार दिनांक ०९/०७/२०२४ एक अत्यंत सुंदर आणि पर्यावरणाचा संदेश आणि लग्न असा दुग्धशर्करा सोहळा मोठ्या थाटात रेल्वेच्या ऑफिसर क्लब विजापूर रोड, येथे पार पडला.

रेल्वेतील अधिकारी व सोलापूरचे पर्यावरण प्रेमी श्री शिवाजी कदम यांच्या यांच्या नियोजनात मुलीचा लग्न सोहळा पर्यावरण पूरक असावा असा उद्देश ठेवून एका विशिष्ट पैलू ने मोठ्या थाटात आणि उत्साहात संपन्न झाला.

त्यांच्या कुटुंबीयांकडून सुबक अशा लग्नपत्रिका रुमालावर छापण्यात आल्या. तसेच झाडे लावण्यासाठी त्याची जपून करण्यासाठी व प्रदूषण कमी करण्यासाठी फलक लावण्यात आले.तत्पूर्वी आदल्या दिवशी म्हणजे सोमवारी दोन्ही कुटुंबातील सदस्यांनी हळदी दिवशी रेल्वे कॉलनीत ५ झाडे लावण्यात आली. लग्नामध्ये ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी कुठल्याही प्रकारचा कर्कश आवाज करणारी साऊंड सिस्टिम व डीजे लावण्यात आला नाही. लग्न समारंभात जेवणाचा व पाण्याचा अपव्यय टाळण्याचा वाढपींना व पाहुण्यांना सल्ला देण्यात आला. सिंगल यूज प्लास्टिक चा वापर टाळण्यात आला, पिण्याचे पाणी कागदी गलासात दिले गेले.वीदाई समारोहसाठी बॅटरी गाडी चा वापर करण्यात आला.लग्न समारंभात उपस्थित सर्वांसाठी एक झाड तसेच झाडे लावा झाडे जगवा अशी संदेश असणारी कापडी पिशवी देण्यात आली. या उपक्रमाचे दोन्ही कुटुंबातील पाहुण्यांनी उपस्थित अधिकारी वर्ग कर्मचारीवर आणि इतर सर्वांनी कौतुक केले. श्री कदम यांनी लग्न सोहळा पर्यावरण पूरक असावा असा संदेश सर्वांनाच देण्याचा प्रयत्न केला.

# निसर्गाच्या सान्निध्यात डोमरी गुरुकुलात नेतृत्वगुण विकसन शिबीर संपन्न



बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा विकास करुन त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयाने निसर्गाच्या सान्निध्यात वसलेले सोनदरा गुरुकुल डोमरी येथे नेतृत्वगुण विकसन शिबीर आयोजित केले होते.

प्रतिमापूजन व शिबीर गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी गुरुकुलातील मुख्याध्यापक श्री दादाराव चव्हाण व शिक्षिका श्रीमती सुवर्णा पवार यांनी मार्गदर्शन केले. नंतर शालेय समिती अध्यक्ष मा प्रमोदजी कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की अशा शिबिराच्या आयोजनातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो तसेच व्यक्तीमत्वात चांगला बदल होताना दिसतो.

अध्यक्षीय समारोप करताना श्री उमेश जगताप यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या उपजत गुणांना उभारी देऊन नेतृत्वगुण विकसित करण्याचे काम आपली संस्था करते. नेतृत्वगुण विकसित करण्याचे बाळकडू विद्यार्थी दशेतच प्राप्त होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. या सत्राचे प्रास्ताविक अभ्यास पूरक प्रमुख सौ सुजाता चिंचपूरकर यांनी केले.

दुसऱ्या सत्रात सौ. सुलक्षणा खणके यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्वगुण या विषयावर अतिशय उत्तम मार्गदर्शन केले. या सत्राचा अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक श्री विजेंद्र चौधरी यांनी केला.

तिसरे सत्र हे श्रमदानातून संस्कार याविषयी होते. या सत्रात विद्यार्थी व शिक्षकांनी मिळून परिसरात प्रत्यक्ष श्रमदान केले. यानंतर सौ. गौरी डावखरे यांनी श्रमदान याविषयावर आपल्या ओघवत्या वाणीत मुलांना मार्गदर्शन केले. पर्यवेक्षक श्री दत्तात्रय तांबारे यांनी अध्यक्षीय समारोप केला. चौथ्या सत्रात विद्यार्थ्यांचे मंडळश: एकत्रिकरण करून काही प्रमुख शिक्षकांनी बलोपासक, कलोपासक, ज्ञानोपासक व विज्ञान मंडळ यांची माहिती दिली. पाचवे सत्र हे मनोरंजनाचे होते. काही विद्यार्थ्यांनी मुकाभिनय, गीत, लघुनाटिका यांचे सादरीकरण केले. यात मुख्याध्यापक श्री विजेंद्र चौधरी यांनी ही एक सुंदर भावगीत सादर केले. समारोपाच्या सत्रात काही विद्यार्थ्यांनी आपले अनुभव कथन केले. शिबीर निरीक्षक सौ. अपर्णा मुळे यांनी मार्गदर्शनकेले.स्थानिक समन्वय समिती कार्यवाह मा.डॉ. अविनाश देशपांडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या सत्राचे अध्यक्ष म्हणून स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष मा.डॉ. पुरुषोत्तम कुलकर्णी होते. विद्यार्थ्यांनी यांची प्रकट मुलाखत घेतली व त्यांच्या जीवनाविषयी व कार्याविषयी प्रश्न विचारले. आभार प्रदर्शन सौ. सुजाता चिंचपूरकर यांनी केले.

# अनुसूचित जाती आणि जमातीतील वर्गीकरण सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा असविधानिक - एड. सिद्धार्थ शिंदे

बीड ।प्रतिनिधी

अनुसूचित जातीमध्ये देशांमध्ये एकूण १२०० जाती येतात त्यामधील ८०% जाती पूर्वीच्या अस्पृश्य जाती आहेत.हजारो वर्षापासून पिढ्या दर पिढ्या मनुवादी व्यवस्था कडून यांचे शोषण करण्यात आलेले आहे. अनुसूचित जातींना शिक्षणाचा अधिकार नव्हता अनुसूचित जातींना आर्थिक उत्पन्न मिळवण्याचा अधिकार नव्हता कोणतीही जमीन त्यांना नव्हती फक्त सवर्ण लोकांची सेवा करणे एवढेच जबरदस्तीने मनुवादी व्यवस्थेने लादण्यात आले होते. या अस्पृश्य लोकांना मूळ प्रवाहामध्ये आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३० ते १९३२ दरम्यान लंडन येथे झालेल्या गोलमेज परिषदेमध्ये ब्रिटिशासमोर अस्पृश्य समाजाच्या व्यथा आणि वेदना वास्तववादी स्वरूपात मांडल्या त्यामुळे गोलमेज परिषदेमध्ये अनुसूचित जाती अस्पृश्य समाजाची एक संघ सूची तयार करणे बाबतचा अधिकार बाबासाहेबांनी मिळवला या देशात प्रथमतः अनुसूचित जातीची सूची १९३५ च्या इंडिया ऍक्ट प्रमाणे आली त्यानंतर संविधान सभेमध्ये अनुसूचित जातीची सूची तयार करण्यात आली त्यावर प्रश्न उत्तरे झाली वादविवाद झाला आणि अनुसूचित जातींची सूची ही भारतीय संसद अस्तित्वात येण्यापूर्वी तयार झालेली आहे या अनुसूचित जातींच्या सूची ला आणि अनुसूचित जातीच्या जमातीच्या सूची ला विशेष दर्जा बाबासाहेबांनी मिळवून दिलेला आहे देशभरात १२०० अनुसूचित जातीचे आणि अनुसूचित जमातीचे १००० अशी एकूण जवळपास २२०० जाती जमातीचे संघटन जमातीचे संघटन बाबासाहेबांनी नैसर्गिक संघटन गोलमेज परिषदेतून संघर्ष करून आणलेला आहे.देशातील जवळपास २२% हा समाज आहे ही एक खूप मोठी शक्ती आणि ताकद लोकशाहीमध्ये आहे. या ताकदीला विभागणी करण्यासाठी तोडा -फोडा आणि हुकूमत करा. या अन्यायकारक तत्त्वप्रणालीप्रमाणे हा निकाल देण्यात आलेला आहे सदरील निकाल हा भारतीय संविधानाच्या न्यायतत्त्वाच्या विरुद्ध आहे कारण अनुसूचित जातीची सूची करण्याचा अधिकार केवळ



राष्ट्रपतींना देण्यात आलेला आहे अनुच्छेद ३४१ (२) प्रमाणे राष्ट्रपती फक्त अनुसूचित जाती आणि जमातीच्या सूचीमध्ये काही ही फेरबदल करू शकतो त्यामुळे दिनांक १ऑगस्ट २०२४ रोजी आलेला सर्वोच्च न्यायालयाचा निकाल हा असंविधानिक आहे. त्यामुळे राष्ट्रवादी दलित आघाडी महाराष्ट्र राज्य वरील सर्वोच्च न्यायालयाच्या निवडण्याचा विरोध करत आहे येणाऱ्या काळात मोठे जन आंदोलन या विषयावर छेडण्यात येणार आहे सर्वोच्च न्यायालयामध्ये पुनर्विचार याचिका दाखल करण्यात येणार आहे अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे संविधान रक्षक संयोजक एड. सिद्धार्थ शिंदे बीड यांनी दिलेली आहे.

श्रावणमास पर्व : श्री केदारेश्वर मंदिर व परिसरात प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी

# नाथ शिक्षण संस्थेकडून आकर्षक रोषणाई व फुलांची सजावट

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई शहरातील जागृत देवस्थान श्री केदारेश्वर मंदिर व परिसरात राज्याचे कृषीमंत्री तथा बीडचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ शिक्षण संस्थेच्या वतिने श्रावणमास पर्व निमित्ताने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांची सजावट करण्यात आली असल्याची माहिती नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदीप खाडे यांनी केले आहे.

सोमवार दि.०५ ऑगस्ट पासून पवित्र श्रावणमास महिन्यास सुरुवात होत आहे. अंबाजोगाई शहरातील जाग्रत देवस्थान श्री केदारेश्वर मंदिरात दर्शन घेण्यासाठी श्रावणमासासात मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होती. कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ शिक्षण संस्थेच्या कडून श्री केदारेश्वर मंदिरात मनमोहक विद्युत रोषणाई, पुष्पसजावट करण्यात आली आहे. विविध फुलांच्या सजावटीने बहरले असून अत्यंत आकर्षक विद्युत रोषणाई सजावट व विविध



आकर्षक फुलांची आरास मंदिर परिसर,गाभारा व सर्व ठिकाणी करण्यात आली आहे.हर हर महादेवचा जयघोष करत श्री केदारेश्वर मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या गर्दीने मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण झाले आहे.

श्रावणमास पर्व : श्री केदारेश्वर मंदिर व परिसरात प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी नाथ शिक्षण संस्थेकडून आकर्षक रोषणाई व फुलांची सजावट करण्यात आली असल्याची माहिती नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदीप खाडे यांनी दिली आहे.




बीड ।प्रतिनिधी

येथील आदर्श शिक्षण संस्था संचलित सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त बालरोग तपासणी अभियानांतर्गत पदव्युत्तर बालरोग विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१ऑगस्ट २०२४ रोजी पिंपळवाडी हायस्कूल,पिंपळवाडी ता.जि.बीड येथे शालेय विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. याप्रसंगी भाळवणीचे माजी सरपंच श्री दादाराव बहिरवाळ, समाजसेवक शेख शब्बीर भाई उपस्थित होते. या शिबिरादरम्यान डॉ. पूनम शिंदे (सहयोगी प्राध्यापिका बालरोग विभाग), तसेच पदव्युत्तर बालरोग विभागातील डॉ. सचिन गायकवाड, डॉ.कोमल शिंगणे ,डॉ.रिचा साठे डॉ. शिल्पा सिरस्कर आणि आंतरवासियता प्रशिक्षणार्थी विद्यार्थी रोशन राठोड, मयंक यादव, केतन सोमवंशी, शितल तुपे, स्नेहल शिंदे यांनी ३७१विद्यार्थ्यांची व ९२ ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करून मोफत होमिओपॅथीक औषधोपचार केले.अध्यक्षीय समारोप करताना मुख्याध्यापक श्री प्रदीप जगताप यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या कार्याविषयी माहिती दिली व सर्वांनी त्यांचा आदर्श घ्यावा असे सांगितले.सदर शिबीर एस. के. एच. वैद्यकीय महाविद्यालयाचे सल्लागार डॉ. अरुण भस्मे, प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल, उपप्राचार्य तथा रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गणेश पांगारकर आणि बालरोग विभाग प्रमुख डॉ.एम.डी.आगे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडले. या शिबीराचे सूत्रसंचालन श्री. देशमाने आर. वाय.आणि आभार प्रदर्शन श्री भरणे बि .आर.यांनी केले

# माजलगाव कृ.उ. बाजार समितीची ४ एक्कर जागा विक्री करणार्या संचालक व अधिकार्यांना तात्काळ चौकशी करुन गुन्हे दाखल करा -शेख रशिद

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक व अधिकार्यांनी हातमिळवणी करून कर्जाच्या नावांवर ४ एक्कर जागा विकण्यात आली असुन हयात संचालक व अधिकार्यांची तात्काळ चौकशी करुन गुन्हे दाखल करुन प्रशासनाने ४ एक्कर जागा ताब्यात घेण्यात यावे नसतं लोकशाही मार्गाने एमआयएम पक्षातर्फे तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा एमआयएम शहराध्यक्ष शेख रशिद यांनी जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन देऊन मागणी केली जात.

माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने १७ वर्षांपूर्वी टीएमसी, रस्ते व नाल्यांसाठी कर्ज घेतले होते. बाजार समितीला उत्पन्न मोठ्या प्रमाणात असताना हे कर्ज मुदतीत फेडले नाही. यामुळे व्याज व दंडाची रक्कम वाढत गेली. सध्या बाजार समितीने मनूर रोडवर असलेली चार एकर जमीन विक्री करण्यात आली आहे.

माजलगाव बाजार समिती ही उत्पन्नाच्या बाबतीत मराठवाड्यातील दोन नंबरची बाजार समिती म्हणून ओळखली जाते. या बाजार समितीला शासनाच्या योजनेतून टीएमसीमार्फत बाजार समिती आवारात प्रयोगशाळा, कार्यालय व शेडसाठी २००७ मध्ये १ कोटी, तर नवीन मॉड्यातील रस्ते व नाली बांधकामासाठी १ कोटी रुपये कर्ज अल्प दरात मिळाले होते. यापैकी काही कर्ज बाजार समितीने फेडले होत परंतु नंतर कर्जफेड केली नाही. त्यामुळे कर्जाची रक्कम ३५ लाख तर दंडव्याज ३० लाख झाल्याचे बाजार समितीकडून सांगण्यात आले असून आतापर्यंत कर्जाची परतफेड का केली नाही? हयात कोण जिम्मेदार आहे हयांची तात्काळ चौकशी करावे तसेच माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीची ४ एक्करची जागा प्रशासनाने ताब्यात घेण्यात यावे नसता लोकशाही मार्गाने एमआयएम पक्षातर्फे तिव्र आंदोलन करण्यात येईल



असा इशारा एमआयएम शहराध्यक्ष शेख रशिद यांनी जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन देऊन मागणी केली आहे.

# गढी महाविद्यालयास नॅक मूल्यांकनात B++ मानांकन

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी महाविद्यालयास 'राष्ट्रीय मूल्यांकन परिषद' (NAAC) यांचे कडून मूल्यांकनात CGPA २.८५ गुणांसह (B++) ग्रेड मानांकन प्राप्त झाले.गेल्या चोवीस वर्षापासून गढीचे कला व विज्ञान महाविद्यालय शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर आहे. ग्रामीण भाग आणि ग्रामीण भागातील विद्यार्थी यांच्याशी ऋणानुबंधाची नाळ जोडून आहे. इथला विद्यार्थी आपल्या आणि समाजाच्या प्रगतीत सक्षमपणे भूमिका निभावणारा, चांगल्यासाठी पुढाकार घेणारा असावा यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे हे महाविद्यालय आहे.

उच्च शिक्षणामध्ये आत्ता विविधांगी बदल होत आहेत. या बदलास अनुसरून गढी महाविद्यालय आपल्या नॅकच्या दुसऱ्या साकलला सामोरे गेले. अत्यंत उत्साही वातावरणात ही प्रक्रिया पार पडली




आणि आज नॅक विभागाचा मूल्यांकन अहवाल घोषित झाला. त्यामध्ये जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी महाविद्यालयास 'राष्ट्रीय मूल्यांकन परिषद' यांचे कडून CGPA २.८५ गुणांसह (B++) ग्रेड मानांकन प्राप्त झाले. याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

संस्थेचे अध्यक्ष श्री. अमरसिंह पंडित साहेब, सचिव श्री. जयसिंग भाऊ पंडित, उपाध्यक्ष मा. विजयराजे, मा. रणवीर काका व मा. पृथ्वीराजे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सहकाऱ्यांनी उत्कृष्ठ काम करत ग्रामीण भागातील महाविद्यालयाला नावलौकिक मिळवून दिला. तसेच संस्थेचे श्री. प्रमोद गोरकर, श्री. प्रताप हातोटे व प्रा. गोगुले सर यांनीही वेळोवेळी सहकार्य केले. प्रा. प्रविण सोनुने यांनी योग्य ती दिशा दाखवली. खरच हा क्षण सर्वांसाठी अत्यंत आनंददायी आहे. या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून सर्व सहकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन. आणि विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी घेतलेले परिश्रम सार्थकी ठरल्याची भावना प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे व समन्वयक डॉ. अयोध्या पवळ यांनी यावेळी बोलून दाखवत समाधान व्यक्त केले. या यशाबद्दल महाविद्यालयाचे गढी परिसरासह सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



ओबीसी बहुजन पार्टीचे मराठवाडा संघटक तथा माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते यशवंत अण्णा गायके यांनी शृंगारऋषीगडावर भेट दिली असता यावेळी ह भ प बाल ब्रम्हचारी सुरेशनंद महाराज शास्त्री यांनी यशवंत अण्णा गायके यांचा सत्कार केला यावेळी उपस्थित रामेश्वर गवळी कृष्णा कोळेकर दत्ता बापू नरवटे प्रकाश चुचे माऊली महाराज सजगणे ओमकार महाराज टेके आदी उपस्थित होते.

# ऑगस्ट उजाडला तरी पीक कर्ज न देणाऱ्या बँक वर कारवाई करा - राजेंद्र मोटे

## गेवराई तालुक्यात महाराष्ट्र ग्रामीण बँक ने एकही नवीन शेतकऱ्याला पीक कर्ज वाटप केले नाही



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : दरवर्षी मे महिन्यात शासनातील मंत्री महोदय पेरणी पूर्वी म्हणजे जून आधीच सर्व शेतकऱ्यांना कर्ज देणार अशा मोठ्या घोषणा व जाहिरात बाजी करतात. परंतु प्रत्यक्षात ऑगस्ट उजाडला तरी उद्याप ही हजारो शेतकऱ्यांना पीक कर्ज न देता बँका विविध प्रकारे त्रास देतायत त्यामुळे शेवटी शेतकऱ्यांना सावकाराच्या घरचे उंबरठे झिजवण्याची वेळ येत आहे. तेव्हा जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालून शेतकऱ्यांना बँके कडून होणार त्रास थांबवा आणि तात्काळ पीक कर्ज दयाला भाग पाडावे नसता गाठ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेशी आहे. हे लक्षात बँका नी लक्षात ठेवा असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे मनसे जिल्हा अध्यक्ष राजेंद्र मोटे यांनी इशारा दिला आहे.

एकीकडे जिल्ह्यात खासगी सावकारांचे फावलेले असताना दुसरीकडे बँकाही शेतकऱ्यांना वेळेवर पीक कर्ज उपलब्ध करून देत नाहीत. त्यामुळे ही कर्ज प्रक्रियेची फाईल मंजूर करवून घेण्यासाठी शेतकऱ्यांना बँकांचे उंबरठे झिझविण्याची वेळ आली आहे. बँकांनी कर्ज वाटपात आखडता हात घेतल्याची स्थिती आहे. शेतकऱ्यांना पेरणीपूर्वीच खते, बियाणे, औषधांची खरेदी करण्यासाठी वेळेवर पैशाची उपलब्धता झाली नाही तर खासगी सावकार किंवा अन्य कुणाकडून तरी उसनवारी पैसे घेऊन पेरणी करावी लागते. शेतकऱ्यांना कोणत्याही सावकाराच्या दारात जाण्याची गरज पडू नये, यासाठी दरवर्षी मे महिन्यात शासनातील मंत्री महोदय पेरणी पूर्वी म्हणजे जून आधीच सर्व शेतकऱ्यांना कर्ज देणार अशा मोठ्या घोषणा व जाहिरात बाजी करतात. बँकांना ही रब्बी आणि खरीप हंगामात पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात येते. परंतु गेवराई तालुक्यात शेतकऱ्यांना बँक प्रचंड त्रास व आर्थिक लूट करत असलाचे अनेक तक्रारी महाराष्ट्र नवनिर्माण सेने कडे आल्या असून त्या मध्ये माहिती घेतली असता महाराष्ट्र ग्रामीण बँक चे ७ शाखा आहेत. त्यांनी तर फक्त नव जुण प्रकरण केले आहेत. वरून वाटप आदेश नसल्याचे सांगत एकही नवीन शेतकऱ्यांला पीक कर्ज दिले नाही. मग दत्तक गावातील शेतकऱ्यांनी जायचे कुणाकडे त्याच प्रमाणे एस बी आय शाखा चे पीक कर्ज मंजुरी बीड येथे होत असल्यामुळे तेथे जवळपास जिल्हातील ३५ शाखा चे पीक कर्ज फाईल येतात त्यात तिथे १५ दिवस पासून कर्मचारी नाही. जून पासून पीक कर्ज च्या हजारो फाईल पडून आहेत. त्यात पॉलिसी च्या आडून शेतकऱ्यांना त्रास देण्याचे काम चालू आहे. बी ओ आय बँक मध्ये एकट्या गेवराई मध्ये शेकडो फाईल मंजुरी अभावी पडून आहेत. गढी येथील बँक मध्ये पण अशीच परिस्थिती आहे. जिल्हा बँक तर सर्व पुढारी नी खाऊन टाकली तेव्हा एकंदरीत सर्व गेवराई तालुक्यात सर्व बँक नी शेतकऱ्यांना त्रास देण्याचे काम चालू केले आहे. परंतु आता शेतकऱ्यांनी त्रास सहन करण्याची गरज नाही पीक कर्ज मागणी अर्ज आणि ज्या तक्रारी असतील त्या आमच्या व्हाट्स अप ९४२२३५३४४४ या नंबर ला टाका फक्त आठ दिवसात सर्व बँक ने नखरे बंद करायला भाग पाडून पीक कर्ज देयला लावुत आणि नाही दिल्यास बँक ना महाराष्ट्र नवनिर्माण सेना च्या वतीने धडा शिकवू असा इशारा प्रसिद्धी पत्रकाद्वारे जिल्हा अध्यक्ष राजेंद्र मोटे यांनी दिला आहे.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती बलभीम नगर बुद्ध विहार येथे मोठ्या उत्साहात संपन्न.ऍड तेजस वडमारे

बीड ।प्रतिनिधी

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंती निमित्त बलभीम नगर बुद्ध विहार शिवाजीनगर बीड येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बुद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेच्या वतीने बलभीम नगर बुद्ध विहार येथे शाखा क्र.१ च्या उद्घाटनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, यावेळी शाखेचा उद्घाटना सोबतच बीडमध्ये वाचाल तर वाचाल या बाबासाहेबांच्या संदेशाला आदेश मानून आयु डी जी वानखडे बाबा यांच्या संकल्पनेत आणि प्रयत्नांतून फिरते मोफत वाचनालय केंद्र क्रमांक ३८ वे चे उद्घाटन समारंभ आयोजित होता सोबतच आयु डी जी वानखेडे बाबा यांनी लहान मुलांना बुद्ध वंदनेचे आणि लहान मुलांना उपयुक्त अशा महापुरुषांच्या जीवनावरील आधारित पुस्तक वाटप केले.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे अण्णाभाऊ साठे आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील वैचारिक साम्य या विषयावर व्याख्याते म्हणून लाभलेले बीड जिल्ह्यातील प्रचलित आणि प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते बबनजी वडमारे साहेब यांनी या विषयाला अगदी योग्य न्याय दिला आणि श्रोत्यांमध्ये या विषयावर विस्तृत आणि अभ्यासक मत मांडले.

साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे आणि बाबासाहेबांचा वैचारिक वारसा एकच होता हे सांगताना फकीरा नायक आणि पुणे करारातील बाबासाहेब यावर विस्तृत मार्गदर्शन केले. अण्णाभाऊ ची आणि बाबासाहेबांचे तीन वेळा भेट झाली होती यावर लिखित पुरावे मांडून वडमारे साहेबांना बाबासाहेबातील आणि अण्णाभाऊ मधील संबंध हे किती जवळचे होते हे सिद्ध केले. आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे याच भेटी दरम्यान बाबासाहेबांची आणि अण्णाभाऊंची चर्चा आणि अण्णाभाऊन्ना कशी लोकशाहीर ही पदवी बाबासाहेबांनी दिली. आणि कसे अण्णाभाऊ जागतिक लेवलला कीर्तिमान स्थापित करू शकले, या अशा अभ्यासू विषयावर आयु बबन भाऊ वडमारे यांनी अगदी सोप्या भाषेत सर्वांना मंत्रमुग्ध करून टाकले. विशेष म्हणजे त्यांनी दिलेले लिखित पुस्तकांचे पुरावे हे त्यातील महत्त्वाचा भाग होता. या कार्यक्रमासाठी विशेष म्हणजे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ऍड हनुमंत परमेश्वर कांबळे सर यांनी विराच्या बाहेरील नाली वरून जाण्यासाठी लहान मुलांना व वयोवृध्द महिलांना विहरात जाण्यासाठी पाच मोठया फर्शाचे दान देऊन मार्ग





सुखकर केला त्याबद्दल महीला मंडळाकडून त्याचे आभार मानले या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ड. केतन गायकवाड,(शहराध्यक्ष. भा. बौ. महासभा, बीड) प्रमुख पाहुणे म्हणून ड. हनुमंत परमेश्वर कांबळे, (उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापुर) हे लाभले होते. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून आयु, व्हि. एन. निसर्गंध साहेब, (विभागीय सचिव छ. संभाजीनगर विभाग), आयु, अमरसिंह ढाका साहेब (जिल्हा कौषाध्यक्ष. भा. बौ. महासभा, बीड),आयु. यशवंत कदम सर (तालुकाध्यक्ष. भा. बौ. महासभा, बीड.) भारतीय बौद्ध महा शहर चे आयु संतोषजी जोगदंड, बौद्धाचार्य सदाशिव अण्णा कांबळे हे उपस्थित होते. तसेच निसर्गंध ताई, (जिल्हाध्यक्ष भा बौ म, बीड) ज्येष्ठ पत्रकार डोंगरे साहेब, बौद्ध महासभेचे सूर्यवंशी साहेब या सुद्धा उपस्थित होत्या. विशेष करून उपस्थिती दर्शविलेल्या त्रिरत्न बुद्ध विहार पंचशील नगर बीड येथील महिलांचे संख्या दर्शनीय होती.या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणून देविदास राऊत सर, आयु अण्णासाहेब शेळके सर, आयो धर्मराज मुजमुले साहेब, ड. चंद्रवधन जाधव, जोगदंड सर, आझाद समाज पार्टीचे आयु आशिष कुमार चव्हाण, प्राध्यापक सुतार सर, पत्रकार सुनीलजी डोंगरे सर, संपादक दीपक थोरात, नीतीन मजमुले उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजक ड. तेजस वडमारे, अंजली तेजस वडमारे, अंजली विशाल वाघमारे, जयश्री विशाल वडमारे, स्वाती अमर वडमारे, आंचल अमर वडमारे, माधवी वडमारे,कोमल प्रकाश वाघमारे, सुजाता इंदर वाघमारे, सह्याद्री नितीन भालेराव, सरिता गौतम खेमाडे, दिपाली अजय जाधव, सोनाली अनिल अंकुटे, आशा राजू धन्वे, किरण राम वडमारे, क्रांती संजय धन्वे, वनीता सुरेश अंकुटे, सांची राम वडमारे, जयश्री गवळी, कमलबाई अंकूटे, आशाबाई खेमाडे, हेमाबाई वडमारे, हौसाबाई वाघमारे, मालन अंकुटे गौतम खेमाडे ,अजय जाधव, आर्यन साळवे, अनिल अंकुटे, सचिन वाघमारे,सिद्धार्थ विद्यागार, करण वाघमारे, मंगेश वडमारे,बन्सी वाघमारे, निवृत्ती वाघमारे,आयु. संतोष जोगदंड, व बलभीम नगर, मित्र नगर, शिवाजीनगर येथील सर्व बौद्ध उपासक उपसीका बालक बालिका व भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेचे व बलभीम नगर शाखेचे सर्व पदाधिकारी हजर होते.

# महाविकास आघाडीने शेकापच्या भाई ॲड.नारायण गोले पाटलांना उमेदवारी द्यावी-भाई गणपतराव कोळपे



माजलगाव ।प्रतिनिधी

बीड जिल्हा लाल बावट्याचा बालेकिल्ला म्हणून पूर्वी ओळखला जायचा याच बीड जिल्ह्याने सन १९६७ साली थोर स्वातंत्र्य सेनानी प्रति सरकारचे संस्थापक क्रांतिसिंह नाना पाटील यांना लोकसभेत पाठवले, त्यानंतर स्वातंत्र्यसेनानी माजी खासदार गंगाधर आप्पा बुरांडे यांनी देखील जिल्ह्याचे नेतृत्व केले, त्यानंतर गेवराईतून माजी आमदार भाई पवार, चौसाळा मतदारसंघातून माजी आ. भाई जनार्दन तुपे तर बीड विधानसभेत माजी आ.कॉम्रेड काशिनाथराव जाधव यांच्यासह अनेक लालबावट्याचे आमदारही निवडून आले, त्यामुळे बीड जिल्हा लालबावटच्याचा बालेकिल्ला समजला जात असे, सन २००४ साली शेकापच्या भाई थावरेंनी याच मतदारसंघात तब्बल ३५ हजार मते मिळवली होती. तर माजलगाव मतदार संघात चौसाळा मतदार संघातील वडवणी व धारूर तालुक्याचा समावेश झालेला असल्याने वडवणी, धारूर या तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाला मानणारा खूप मोठा वर्ग आहे. माजलगाव मतदार संघात २०१९ साल च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस,शेतकरी कामगार पक्ष आघाडीच्या आ.प्रकाश सोळंके यांना माजलगाव मतदार संघातील जनतेने शरदचंद्रजी पवार साहेब आणि पुरोगामी विचाराचे प्रतिनिधी म्हणून विजयी केले परंतु त्यानंतर आ.प्रकाश सोळंके यांनी अवघ्या काही तासात पहाटेच्या शपथविधीला पाठिंबा दर्शवून भारतीय जनता पक्षाला सहकार्य करण्याची भूमिका घेऊन माजलगाव मतदार संघातील जनतेचा विश्वासघात केला होता, पुढे ईडीच्या भीतीमुळे अजित पवार यांनी भाजप सोबत जाण्याचा घेतलेल्या निर्णयाला संमती दर्शवत आ. प्रकाश सोळंके हे भाजप सोबत गेलेल्या राष्ट्रवादीच्या गटात ईडीच्या भीतीपोटी सामील झाले, केवळ सत्तेचा माग धरून काम करणाऱ्या आमदार प्रकाश सोळंके यांनी माजलगाव मतदार संघातील जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून जनतेला वाऱ्यावर सोडण्याचे पाप केले,परंतु माजलगाव मतदार संघात शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नावर शेतकरी कामगार पक्षाचे लढाऊ नेते भाई ड. नारायण गोले पाटील यांनी आपल्या आक्रमक भूमिकेने अनेक मोर्चे , आंदोलने करून प्रशासनासह शासनाला धारेवर धरत शेतकऱ्यांना न्याय मिळवून देत, शेतकऱ्यांची खते बी बियाण्या मध्ये होणारी लूट, प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांकडून होणारी लूट थांबवण्याचे काम शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांनी केले आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचा माजलगाव विधानसभेचा आश्वासक चेहरा म्हणून जनसामान्यात, शेतकऱ्यांमध्ये त्यांची चांगली प्रतिमा असून सत्तेसाठी नाही तर सत्यासाठी लढणारे धडाडीचे नेते म्हणून त्यांची ओळख सबंध मतदार संघात आहे, विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अनेक प्रस्थापित राजकीय नेते विविध राजकीय पक्षाची उंबरठे झिजवत असताना प्रमाणिकपणे चळवळीत काम करणारा, धाडसी कार्यकर्ता म्हणून भाई ड. नारायण गोले पाटील यांची वेगळी ओळख आहे, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत माजलगाव मतदार संघातील सर्व प्रस्थापित पुढारी भाजपच्या बाजूने असताना, महाविकास आघाडीच्या खा.बजरंग बप्पा सोनवणे यांना माजलगाव मतदार संघातून चांगले मताधिक्य मिळवून देण्यासाठी गावा- गावात-वाडी-वस्तीत जाऊन केंद्र शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाचा पर्दापाश करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे, तसेच आगामी काळात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी तसेच माजलगाव मतदार संघातील शेकडो प्रलंबित प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांच्यासारख्या तरुण तडफदार, प्रमाणिक नेतृत्वाची गरज आहे त्यामूळे महाविकास आघाडीचे नेते मा. शरदचंद्रजी पवार साहेब, मा. उद्धवजी ठाकरे साहेब, मा. नाना पटोले साहेब, भाई जयंत पाटील साहेब यांनी भाई ड. नारायण गोले पाटील यांच्यासारख्या शेतकरी कुटुंबातील लढवय्या नेत्यास माजलगाव विधानसभेची उमेदवारी द्यावी असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे भाई गणपतराव कोळपे यांनी केले असून लवकरच शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई जयंत पाटील यांना भाई मोहन गुड यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव मतदार संघातील शेतकरी कामगार पक्षाचे शिष्ट मंडळ भेटून मागणी करणार आहे तसेच बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड व माजलगाव मतदार संघातील शेतकरी कामगार पक्षाचे शिष्ट मंडळ यांची महाविकास आघाडीने शेतकरी कामगार पक्षाला माजलगाव मतदार संघ सोडण्याबाबत संयुक्त बैठक होणार असल्याची माहिती



सुलतानपूर ता माजलगाव परीसरात

## वादळ वाऱ्यासह पाऊस झाल्याने सोलर पंपाचे नुकसान

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील सुलतानपूर येथील शेतकरी संजय नारायण लोखंडे यांच्या शेतातील सोलर पंप वादळी वाऱ्यामुळे तुटून पुर्ण पणे नुकसान झाले आहे ग्रामपंचायत सुलतानपूर ता.माजलगाव जि. बीड यांच्या कडुन दाखला देण्यात येत आहे की शेतकरी संजय नारायण लोखंडे रा. सुलतानपूर ता माजलगाव जि बीड सुलतानपूर शिवार गट न. २३५ वर असुन त्यांच्या विहिरी मध्ये सोलर पंपाचे एकुण ९ प्यानल असुन ते सर्व वादळ वाऱ्यानी फुटले असुन त्याचा मी स्वतः पंचनामा केला आहे त्यामधील सर्व सोलर पंपाचे तुकडे झाले आहेत तसेच वाऱ्यामुळे सर्व तुटुन उपसुन पडले आहेत त्यामुळे सर्व खराब झाले आहे तरी या पंपाची दुरुस्ती करून देण्यात यावी साक्षीदार. दिलीप नाईकनवरे गणपत शेषराव धिरडे भारत लोखंडे दगडु लोखंडे सदाशिव लोखंडे

# संतोषसिंग रहेकवाल यांची सुभेदार मेजर पदी पदोन्नती

किल्ले धारूर ।प्रतिनिधी

किल्ले धारूर चे सुपुत्र संतोषसिंग भारतसिंग रहेकवाल याची नुकतीच सुभेदार मेजर पदी पदोन्नती झाली आहे. या बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. संतोषसिंग भारतसिंग रहेकवाल हे आदर्श क्रीडा शिक्षक भारतसिंग जयपालसिंह रहेकवाल यांचे सुपुत्र असून त्यांचे प्राथमिक शिक्षण जि.प.शाळा वकीलवाडी केज येथे झालेले आसून माध्यमिक शिक्षण जिल्हा परिषद माध्यमिक शाळा केज येथे झालेले होते. पुढे त्यांची भारतीय सैन्य अंतर्गत बॉईज स्पोर्ट्स कंपनी पुणे अंतर्गत रोइंग नौकायन क्रीडा प्रकारासाठी निवड झाली.या क्रीडा प्रकारात त्यांना पाच वेळा राष्ट्रीय स्पर्धेत पारितोषिक मिळाले व दोन वेळा आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली होती.नंतर क्रीडा कोठयातून भारतीय सैन्यदलात त्यांची भरती झाली.२५ वर्ष सेवा केल्यानंतर त्यांची आता सुभेदार मेजर पदी पदोन्नती झाली आहे. पदोन्नती बाबतचे सन्मानाचे अशोक स्तंभ चिन्ह कर्नल विशाल पाठक साहेब व वडील



भारतसिंग रहेकवाल यांच्या शुभ हस्ते व आई सौ.शकुंतला व पत्नी सौ.पुजा यांच्या सह कुटुंबीयांचे समक्ष लावून बॉम्बे इंजिनीअरींग ग्रूप पुणे येथे त्यांना सन्मानित करण्यात आले. पदोन्नती नंतर माध्यमांशी बोलताना सुभेदार मेजर संतोषसिंग रहेकवाल म्हणाले की, मला माझे वडील आदर्श क्रीडा शिक्षक भारतसिंग रहेकवाल,प्रा.हनुमंत भोसले,प्रा.ईश्वर मुंडे यांचे मार्गदर्शन लाभलेले होते.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता असून शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन व विद्यार्थ्यांनी प्रमाणीकपणे प्रयत्न केले तर ग्रामीण विद्यार्थी नक्कीच सर्वच क्षेत्रात यशस्वी होतात.

# बीड शहरात रस्ता विकास कामांचे डॉ. ज्योती मेटे यांच्या हस्ते भूमिपूजन

बीड शहरात तीन कोटी रुपयांच्या रस्ता विकास कामांचे डॉ. ज्योती मेटे यांच्या हस्ते भूमिपूजन

बीड ।प्रतिनिधी

सद्यपरिस्थितीत बीडमध्ये सर्वत्र चिखल आणि खड्डेमय रस्ते पहावयास मिळतात मुख्य रस्त्याचे हे हाल आहेत तर गल्लो गल्लीतील रस्ते नसल्याने नागरिक समस्यांना तोंड देत आहेत. अपघात, धूळ आणि चिखल या समस्याने नागरिक हैराण असताना यावर फुंकर घालण्यासाठी शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉक्टर ज्योती विनायकराव मेटे यांनी आज बीड शहरांमध्ये तीन कोटी रुपयांच्या विविध रस्ते विकास कामांचे भूमिपूजन केले. याप्रसंगी शिवसंग्रामचे जेष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद, सुहास पाटील, अनिल घुमरे, प्रा.सुभाष जाधव, नितीन लाटकर, मनोज जाधव, संघर्ष वडमारे,डॉ.राजेंद्र बंड,कैलास शेजाळ, केजकर, बाळासाहेब कुलकर्णी, राम औटे , नामदेवराव शिंदे, अभिजीत जाधव, संभाजी शिंदे, शिवदास राठोड, संतोष भालेकर,हरिश्चंद्र ठोसर, अविनाश पानगावकर, दिलीप गायकवाड, यांच्यासह शिवसंग्रामचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.



बीडकरांचे दुर्दैव त्यांना चाळीस वर्षात चांगले लोकप्रतिनिधी मिळाले नाहीत :- डॉ. ज्योती मेटे

बीड शहरातील भक्ती कन्स्ट्रक्शन, एकनाथ नगर, विश्वेश्वर कॉलनी, परिसरात आज डॉ. ज्योती मेटे यांच्या हस्ते हा भूमिपूजन कार्यक्रम संपन्न झाला या वेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधला याप्रसंगी त्या बोलत होत्या बीड शहराची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. सर्वत्र अस्वच्छ्ता, पाण्याची समस्या, खराब, धुळमय आणि चिखलानी माखलेले रस्ते या मुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. याकडे प्रशासनाचे लक्ष नाही. त्याच बरोबर गेल्या चाळीस वर्षात बीड शहर विकासा पासून कोसो दूर आहे आणि याकडे लोकप्रतिनिधी यांनी दुर्लक्ष केले त्यामुळे आज नागरिकांना या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे बीडकरांचे दुर्दैवच म्हणावे लागेल की त्यांना चांगले लोकप्रतिनिधी मिळाले नाहीत. असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी या भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


रस्ता मंजूर केल्या बद्दल महिलांनी मानले डॉ. ज्योती मेटे यांचे आभार.

वर्षानुवर्ष रस्ता नसल्याने आम्हला मुलांना शाळेत पाठवण्यासाठी आणि दैनंदिन जीवनात अडचणी भेडसावत होत्या आज हा रस्ता मंजूर केल्या बद्दल या भागातील महिलांनी डॉ. ज्योती मेटे यांचे मा.नगरसेविका प्रियांका सुहास पाटील, गोपिका जाधव, संगीता ठोसर, ज्योती शिंदे, पल्लवी जाधव, रेश्मा उनवणे, तैर मॅडम, मनीषा भालेकर, हिरताई हाडे, अंबिका हाडे, यांनी आभार मानले.

# रत्नागिरी-सिंधुदुर्ग रहिवासी मंडळावर महिलाराज,अध्यक्षपदी संगिता चेंदवणकर यांची निवड

बदलापूर ।प्रतिनिधी

रत्नागिरी-सिंधुदुर्ग रहिवाशी मंडळ-बदलापूर या बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत,मंडळाच्या नविन कार्यकारिणीची निवड झाली.या नवीन कार्यकारिणीच्या बहुतांश पदांवर महिला पदाधिका-यांची एकमताने निवड करण्यात आली.मंडळाच्या या कार्याने समाजासमोर उत्तम आदर्श निर्माण केला आहे.रत्नागिरी-सिंधुदुर्गव रहिवासी मंडळ बदलापूर परिसरात अनेक सांस्कृतिक,सामाजिक कार्य करणारे मंडळ म्हणून मागचे पंचवीसहून जास्त वर्ष कार्यरत आहे.मंडळाद्वारे अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात.यात



महिलांचा सहभाग ही बरोबरीचाच असतो.यामुळेच महिलांच्या या कार्याचा सन्मान म्हणून नवीन कार्यकारिणीत जास्तीत जास्त महिलांना सहभाग द्यावा आणि महिलांचा सामाजिक सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न व्हावा,त्यासाठी एकमताने महिला पदाधिका-यांची निवड झाली.नवनिर्वाचित अध्यक्षा संगिता चेंदवणकर यांनी महिलांवर दाखविलेल्या या विश्वासाबद्दल मंडळाचे आभार मानले.बदलापूर परिसरात लाखो कोकणवासिय राहतात.या चाकरमान्यांना बदलापुरातून गावी जाण्यासाठी,वाहतुकीच्या काही उपाय योजना करता येतील का यासाठी प्राधान्य देणार अशी ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली.नवनिर्वाचित सचिव सौ.अनिता सावंत यांनी नवीन कार्यकारिणी बदलापूरात कोकण भवन निर्माण करण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करेल असे आश्वासन दिले.तर नवनिर्वाचित खजिनदार श्रावणी पवार यांनी येणा-या काळात मंडळाद्वारे उत्तमोत्तम उपक्रम राबविले जातील आणि त्यासाठी जास्तीत जास्त महिलांना सहभागी करून घेतले जाईल याचे आश्वासन दिले.यावेळी नविन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.अध्यक्षा-संगिता चेंदवणकर,उपाध्यक्ष-गिरीश राणे,सचिव-अनिता सावंत,सहसचिव-आशा पालव,कार्याध्यक्ष-महेश सावंत,खजिनदार-श्रावणी पवार,उप खजिनदार-भावना परब,कार्यकारिणी सदस्य-अंकिता सदडेकर,श्रध्दा मेस्त्री,प्रियांका पाताडे,अर्चना राणे,शमिका मुणगेकर,गुरुनाथ तिरपणकर.शेवटी माजी अध्यक्ष चंद्रकांत पाटील व माजी सचिव मंगेश कदम यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीकडे मंडळाचा पदभार सोपविला व सर्वांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# श्रावण महिन्यातील पहिल्या सोमवारी धुनकेश्वर मंदिरात भाविकांची गर्दी



## डोंगरपट्ट्यातील हजारो भाविकांनी घेतले दर्शन

किल्ले धारूर (रोहित फावडे)

धुनकवाडचे ग्रामदैवत धुनकेश्वर मंदिरात श्रावण महिन्यातील पहिल्या सोमवारी भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती डोंगरपट्ट्यातील हजारो भाविकांनी घेतले दर्शन.हर-हर महादेव,धुनकेश्वर महाराज की जय या गर्जनाने धुनकेश्वर नगरी दुमदुमून गेली होती. गेल्या आठ वर्षांपासून धुनकवाड येथील धुनकेश्वर मंदिरात श्रावण सोमवार महोत्सव आयोजित केला जात आहे या वर्षी ही भाविकांची श्रद्धा असलेल्या धुनकेश्वर मंदिरात भाविकांनी गर्दी केली होती. भागवताचार्य ह.भ.प.श्रीराम महाराज शेळके मोरवडकर यांचे सुश्राव्य वाणीतुन किर्तन सेवा केली. किर्तन सेवेनंतर महाप्रसादाचे यजमान शहाजी लक्ष्मण जाधव,विष्णू रामराव मुंडे,गोपीनाथ रामकिसन यादव,बळीराम आश्रुबा काळे,राम त्रिंबक कागणे,डिगांबर आश्रुबा चादर,शिवाजी बंकटी यादव, दत्ता शिवाजी काजळे,गोरख दत्ता कागणे,शिवाजी रामनारायण यादव,दामोदर कुंडलिक भोसले,महादेव बन्सी शेंडगे,धनराज प्रभाकर मनेरी,भरत गंपू भारस्कर,दत्ता वैजनाथ भोसले,रघुनाथ वैजनाथ भोसले,शिवाजी राजेभाऊ यादव,भागवत संदिपान सावंत,बापू सखाहारी डोंगरे,श्रीराम दत्ता कागणे, संतोष दादाभाऊ वनवे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.यावेळी हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला व हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धुनकेश्वर श्रावण महोत्सव समिती व ग्रामस्थांनी मेहनत घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला.

# एस. के.एच वैद्यकीय महाविद्यालयातर्फे जागतिक स्तनपान सप्ताहाचे आयोजन

बीड ।प्रतिनिधी

जगभरात दरवर्षी ऑगस्ट महिन्याचा पहिला आठवडा स्तनपान सप्ताह म्हणून साजरा केला जातो त्यानुषंगाने आदर्श शिक्षण संस्था संचलित सोनाजीराव क्षिरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय, बीड येथील पदव्युत्तर बालरोग विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने जि.प.आरोग्य विभाग उपकेंद्र पिंपळवाडी ता.जि.बीड येथे दि.१ ऑगस्ट २०२४ रोजी जनजागृतीपर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरादरम्यान सुरुवातीला डॉ. पूनम शिंदे सहयोगी प्राध्यापिका बालरोग विभाग एस. के. एच. मेडिकल कॉलेज बीड यांनी हा सप्ताह साजरा करण्यामागचा उद्देश स्तनपानाचे फायदे आणि आवश्यकतेबद्दल लोकांना जागृत करणे असा असून यावर्षीची थीम क्लोजिंग दि गॅप - ब्रेस्टफीडिंग सपोर्ट फॉर ऑल अशी आहे म्हणजे सर्व स्तरांवरील मातांसाठी स्तनपान सुलभ करणे हा या वर्षाचा उद्देश आहे आणि कुटुंब, समाज तसेच आरोग्यसेवा कर्मचाऱ्याद्वारे स्तनपान करणाऱ्या प्रत्येक मातांना पाठिंबा देऊन स्तनपानाचा प्रवास सुलभ करण्यासाठी आयोजित केलेली आहे असे सांगितले.शिबीरात पुढे डॉ. शारदा सारंग सामुदायिक आरोग्य अधिकारी (सी.एच.ओ.) पिंपळवाडी यांनी स्तनपानाचे महत्त्व, स्तनपान करण्याचे बाळासाठी आणि आईसाठी असणारे फायदे विशद केले, त्यानंतर गावातील महिला तसेच गरोदर व स्तनदा माता यांना डॉ. रिचा साठे, डॉ. कोमल शिंगणे (पदव्युत्तर विद्यार्थिनी बालरोग विभाग) यांनी माहिती शिक्षण आणि संप्रेषण साहित्याद्वारे (खएउ चरींशीळरश्र) स्तनपानाच्या पद्धती, आईच्या दुधाचे घटक,स्तनपानाचे महत्त्व व फायदे ,बॉटल फिडिंग चे दुष्परिणाम हे दाखवले आणि समजावून सांगितले सदर शिबिराच्या यशस्वीतेसाठी परिचारक मोराळे आणि श्री.गव्हाणे आरोग्य सहाय्यक प्राथमिक आरोग्य केंद्र चर्हाटा यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सदर शिबिराच्या आयोजन एस.के.एच.वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल आणि उप प्राचार्य तसेच रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गणेश पांगारकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT